आम्ही कोणताही दावा दाखल केलेला नाही. कृष्णा व त्याची पत्नी गावाकडे वेगळे राहात होते.

(प्रतिवादींच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन तहकूब.)

**श्रवणोत्तर स्विकृत./समक्ष**

**वाई** **(डी.आर.माळी)**
**दि. १३/०९/२०१९** **२ रे सह.दि.न्या.क.स्तर, वाई**

**शपथेवर पुढील उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.ए.के.शिंदे यांचेतर्फे पुढे सुरु :—**

१३. माझे बहिणींनी माझे हक्कात दावा जागेबाबत हक्कसोडपत्र दिलेले नाही. इतर मिळकतींचे हक्कसोडपत्र बहिणींनी माझे नावे करुन दिलेले आहे. इतर मिळकतींचे हक्कसोडपत्र केले त्यावेळेस दावा मिळकतीबाबत हक्कसोडपत्र करुन घेणेस मला कोणतीही अडचण नव्हती. मी बहिणींकडे हक्क सोडणेबाबत मागणी केलेली होती. कृष्णा याचे हक्क आम्हा वादींना आहेत असे मी प्रतिवादीस लेखी कळविलेले नाही अथवा तसा आक्षेप घेतलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वडीलांच्या मृत्युनंतर सन २००५ अखेर आम्ही प्रतिवादीकडे कब्जाची मागणी केलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांनीसुध्दा अशी मागणी केलेली नव्हती. माझे वडीलांनी कब्जा मागण्यासाठी दावा दाखल केलेला नव्हता.

१४. प्रतिवादी हे पांढरेचीवाडी येथे मळयात राहातात. मळयाचे नाव मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही त्याच ठिकाणी आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी राहातो त्या ठिकाणापासून अंदाजे २०० मिटर अंतरावर दावा मिळकत आहे. साक्षीदार सांगतात की, हे अंतर सुमारे ५ किलोमीटर आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही पांढरेचीवाडी गावच्या हद्दीत आहे. बावधन येथून व्याजवाडीला जातेवेळेस पांढरेचीवाडी हे गाव लागते. वादमिळकतीच्या पूर्वेस अरुण कदम यांची जमीन आहे. पूर्वी कदम यांचे आडनाव शेडगे असे होते. दावा मिळकतीच्या दक्षिणेस पूर्वी शेडगे व सध्या थोरात यांची जमीन आहे. दावा मिळकतीच्या पश्चिमेस जगन्नाथ पिसाळ यांची जमीन आहे. पूर्वी त्यांना इनामदार म्हणून ओळखले जात होते.

जगन्नाथ यांच्या पूर्वाधिका—याचे नाव मला माहित नाही. साक्षीदार पुन्हा सांगतात की, पश्चिमेस भगवान पिसाळ यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, भगवान पिसाळ यांचे नाव मी चुकीचे सांगत आहे. दावा मिळकतीच्या उत्तरेस पूर्वी पांडुरंग सपकाळ व सध्या हणमंत सपकाळ यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीची उत्तरेची चतु:सिमा मी चुकीची सांगत आहे. मी या दाव्यात लगत हिस्सेदारास साक्षीदार म्हणून तपासणार आहे. मी काशीनाथ पिसाळ यांची साक्ष नोंदविणार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे हयातीत दावा मिळकतीत कधीही गेलो नाही त्यामुळे सदरची मिळकत कोठे आहे हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी राहातो त्या ठिकाणाच्या उत्तरेस दावा मिळकत आहे. दावा मिळकत ही बावधन गावाच्या पूर्वेस आहे. बावधन गावाच्या दक्षिणेस पांढरेचीवाडी हे गाव आहे. हे म्हणणे खरे नाही की, बावधन गावच्या पूर्वेस पांढरेचीवाडी हे गाव आहे. दावा मिळकत ही पांढरेचीवाडीच्या पुर्वेस आहे.

१५. मी व माझे भाउ वेगळया चुली करुन राहातो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही तिघेही वेगवेगळा शेती व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही तिघेही भाउ प्रत्येकाच्या कुटुंबाचा वेगळा व्यवहार करतो. दावा मिळकत ही आम्हा तीन भावांच्या मालकीची झाली असे दाखविणारा दस्तऐवज माझेकडे नाही. दावा मिळकत ही माझे वडीलांच्या एकटयाच्या मालकीची झाली असा दस्तऐवज माझेकडे नाही. रे.दि.अ.क्र.१३२/२०११ या प्रकरणाचा निकाल झाल्यामुळे मी हा दावा दाखल केलेला आहे. रे.दि.मु.नं.३६३/२००६ या दाव्यात कब्जा मागणीसाठी दाद मागण्यास आम्हाला कोणतीही अडचण नव्हती. सन १९७६ मध्ये प्रतिवादीकडून कब्जा मागणीसाठी आम्हाला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला दावा दाखल करणेस दि. ९/०४/२०१७ रोजी कोणतेही कारण घडलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दावा मिळकतीचे कायदेशीर व रितसर मालक नाही. सातबारा उतारा आमच्या नावचा आहे त्यामुळे आम्ही मालक आहोत असे माझे म्हणणे आहे. सातबारा उता—यावरील नोंदीबाबत महसुल न्यायालयात अपिल प्रलंबित आहे याची मला माहिती नाही. प्रतिवादीकडून आम्ही वहिवाट काढून मागत आहोत. हे

म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये आम्हाला कोणतीही मालकी राहिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांचा दावा मिळकतीवरील कब्जा हा कायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांच्याकडे दावा मिळकतीचा कब्जा माझे वडील व चुलते यांच्या हयातीपासून आहे. प्रतिवादीकडे कधीपासून कब्जा आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीला त्रास देण्यासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत./समक्ष**

**वाई** **(डी.आर.माळी)**
**दि. ४/१०/२०१९** **२ रे सह.दि.न्या.क.स्तर, वाई**